चुकीचा सौदा

पोलंडची लोककथा



चुकीचा सौदा

पोलंडची लोककथा

मराठी : अश्विनी बर्वे

एक कोल्हा होता आणि एक साळिंदर होते. कोल्ह्याची एक सफरचंदाची बाग होती, तर साळिंदरचे एक शेत होते. एक दिवस कोल्ह्याने साळिंदरला विचारले,

“जर आपण दोघांनी मिळून तुझ्या शेतात काम केले तर आलेले पीक आपण अर्धे-अर्धे वाटून घेवू शकतो. त्याबदल्यात मी तुला माझ्या बागेतील अर्धी सफरचंद देईन.”

“ठीक आहे,” साळिंदर म्हणाले, “पण आधी आपण एक गोष्ट ठरवू, की तू कोणता अर्धा हिस्सा घेशील, हो जमिनीच्या वर हवेत उगतो तो की, जो जमिनीच्या खाली मातीत उगतो तो?”

“मी जमिनीच्या वर येणारा हिस्सा घेईन,” कोल्हा म्हणाला.

“मग आपण बटाटे लावू,” साळिंदरने निर्णय घेतला.

दोघांनी मिळून शेताची नांगरणी केली.

मग त्यांनी बटाटे लावले.



बटाटे काढण्याची वेळ आली, तेव्हा साळिंदर म्हणाले, “पिकाचा वरचा तुझा भाग काढून घे.” कोल्ह्याने तसेच केले, त्याने लवकरच बटाट्याचा वरचा भाग म्हणजे निरुपयोगी पाने काढून टाकली .

त्यानंतर साळिंदरची पाळी आली, त्याने जमीन खोदून मस्त बटाटे काढले.



“आता तुझ्या बागेतले सफरचंद तोडू या आणि त्याची बरोबर वाटणी करू या.” साळिंदर म्हणाले.

साळिंदरला तर त्याच्या शेतातले सगळे बटाटे तर मिळाले, शिवाय कोल्ह्याच्या बागेतली सफरचंदं सुद्धा मिळाली.

पुढच्या वर्षी साळिंदर आणि कोल्हा परत भेटले. “यावर्षी सुद्धा आपण पीक अर्धे-अर्धे वाटून घेवू या का?” कोल्ह्याने विचारले.

“आनंदाने,”साळिंदर म्हणाले. “यावेळी तू पिकाचा कोणता भाग घेशील?” जमिनीच्या वरचा की खालचा?”

“का? यावेळी सुद्धा तुला मला धोका द्यायचा का?! यावेळी मी वेड्यासारखा वरचा हिस्सा घेणार नाही. यावेळी मी जमिनीचा खालचा भाग घेईन,” कोल्हा म्हणाला.

“ठीक आहे,”साळिंदर म्हणाले, “यावेळी आपण गहू पेरू.”

मग दोघांनी शेताची नांगरणी केली.

मग त्यांनी गहू पेरला.

गहू छान वाढला, त्याचे शेत सोन्यासारखे दिसू लागले. गहू झाल्यानंतर साळिंदरने जमिनीचा वरचा भाग कापला.

मग कोल्ह्याने मुळं खोदली, पण त्याच्या कामाचे काहीच त्याला मिळाले नाही.

“चल आता तुझ्या बागेतले सफरचंद तोडून एकमेकांत अर्धे अर्धे वाटू या,” साळिंदर म्हणाले.



कोल्हाला लवकरच कळले की,
तो दुसऱ्यांदा फसवला गेला आहे.
तो मदतीसाठी न्यायाधिशाकडे
गेला.
न्यायाधिशाने साळिंदरला बोलावले
आणि त्याला म्हणाले, "उद्या
तुम्ही दोघे गव्हाच्या शेतात या,
तिथे तुमची शर्यत लावू. तुमच्यात
जो जिंकेल त्याला सगळे गहू
आणि सफरचंद मिळतील."
कोल्हा आणि साळिंदर दोघे
यासाठी तयार झाले.

दुसऱ्या दिवशी ते शेतावर भेटले. न्यायाधिशाने विचारले, “तुम्ही दोघे तयार आहात ना?” मग न्यायाधिशाने शर्यंत सुरु करण्याची सूचना दिली. कोल्हा साळिंदरच्या अपेक्षेपेक्षा खूप जोरात धावला. पण कोल्हयाने कितीही प्रयत्न केला तर साळिंदरच पुढे गेलेले दिसायचे. त्याचे कारण स्वच्छ दिसत होते.

साळिंदरचे कितीतरी नातेवाईक होते. जे दिसायला बिलकुल त्याच्यासारखेच होते. ते गव्हाच्या शेतात जागोजागी लपलेले होते. कोल्हाला पळत येताना पाहताच ते त्याच्या पुढे धावत. फक्त शेवटच्या टप्प्यात फक्त ते साळिंदर धावले.

कोल्हा अर्धे शेत सुद्धा पळाला नाही, तेव्हा त्याने न्यायाधिशाला ओरडतांना ऐकले, “हा बघा विजेता!” आणि तिथे खोल श्वास घेत साळिंदर आनंदात उभे होते. यावेळी साळिंदरने कोल्हाला चांगलाच धोका दिला होता. आता कोल्हा सगळा गहू आणि सफरचंद सुद्धा हातचे घालवून बसला होता.

पुढच्या वर्षी वसंतात साळिंदरने पीक वाटून घेण्याची गोष्ट केली तेव्हा कोल्हाने साफ नकार दिला.

समाप्त